**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी घेणे, निष्कर्ष प्रसिध्द करण्याबाबतचे निर्बंध...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ/ मनपा/२०१२/प्र.क्र.१३/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक ०३/०२/२०१२.

वाचा:- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक- २/२/२०१२ चे आदेश

# आदेश

ज्याअर्थी, राज्यातील २७ जिल्हा परिषदा आणि ३०९ पंचायत समित्यांसाठी **दिनांक- ७ आणि १२ फेब्रुवारी, २०१२ रोजी** मतदान होत आहे. तर १० महानगरपालिकांसाठी **दिनांक- १६ फेब्रुवारी, २०१२ रोजी** मतदान होत आहे.

आणि ज्याअर्थी, दोन्ही निवडणुका पाठोपाठ असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर जनमत चाचणी अथवा मतदानोत्तर चाचणी प्रसार माध्यमांनी घेतल्यास अथवा जिल्हा परिषदेच्या निकालाचे अंदाज त्यांनी केलेल्या चाचणीवरून प्रसिध्द केल्यास त्याचा महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पडू शकतो. याकरिता राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक- ०२/०२/२०१२ च्या आदेशान्वये जनमत चाचणी **(Opinion Poll)** निष्कर्ष आणि मतदानोत्तर चाचणीचे **(Exit Poll)** निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर बंदी घातली आहे. मात्र त्यामध्ये उपरोक्त निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर बंदी कोणत्या कालावधीमध्ये राहील याबाबत उल्लेख नाही.

त्याअर्थी, जनमत चाचणी **(Opinion Poll)** तसेच मतदानोत्तर चाचणीचे **(Exit Poll)** घेणे आणि त्याचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर खालील कालावधीमध्ये बंदी राहील असे आदेशित करण्यात येत आहे.

**१) जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा प्रचाराचा कालावधी संपल्यापासून म्हणजेच दिनांक- ५/२/२०१२ रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून महानगरपालिकेच्या निवडणुकांचे मतदान समाप्तीपर्यंत म्हणजेच दिनांक- १६/२/२०१२ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत.

**२) महानगरपालिका निवडणुका-**

महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराचा कालावधी संपल्यापासून म्हणजेच दिनांक- १४/२/२०१२ रोजी संध्याकाळी ५.३० वाजल्यापासून ते महानगरपालिका निवडणुकांचे मतदान समाप्तीपर्यंत म्हणजेच दिनांक- १६/२/२०१२ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. अ. द. कोल्हे)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र